कर्नाटक सरकार

परिसर अध्ययन

ENVIRONMENTAL STUDIES

अभ्याससहित पाठ्यपुस्तक

TEXT CUM WORK BOOK

(REVISED)

मराठी माध्यम

MARATHI MEDIUM

PART-1

3

इयत्ता तिसरी

THIRD STANDARD

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

Karnataka Text Book Society (R.)
6th Cross, Malleshwaram,
Bengaluru - 560 003.

Preface

The Textbook Society, Karanataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi prepared which in turn are designed based on NCF - 2005 since June 2010. Textbooks are prepared in 12 languages; seven of them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there are the EVS, mathematics and 5th to 10th there are three core subjects namely mathematics, science and social science.

NCF - 2005 has a number of special features and they are:

- connecting knowledge to life activities.
- learning to shift from rote methods.
- enriching the curriculum beyond textbooks.
- learning experiences for the construction of knowledge.
- making examinations flexible and integrating them with classroom experiences.
- caring concerns within the democratic policy of the country.
- making education relevant to the present and future needs.
- softening the subject boundaries, integrated knowledge and the joy of learning.
- the child is the constructor of knowledge.

The new books are produced based on three fundamental approaches namely - Constructive Approach, Spiral Approach and Integrated Approach.

The learner is encouraged to think, engage in activities, master skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the all round development of his/her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country, India.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

Young learners in their initial stages of learning i.e., between the ages of 5 and 10, acquire most of the concepts which they need in consolidating learning in later stages. If this learning is properly planned and well executed in the classroom, children may find learning easy and enjoyable.

Based on these principles, in the early stages from class 1 to 5, the following subject areas have been introduced- Mother tongue, state language, English as a practice language, mathematics and environmental studies. Environmental studies include science and social science related to their daily life experiences, information about their environment, society, country, their duties and rights. These topics are presented through interesting situations and activities. Opportunities have been provided for self learning and creativity. In this stage importance is given to children sitting in pairs and groups and exchange their experiences. The efforts have been made to make illustrations colourful, attractive and meaningful. Teachers are expected to make use of these and help children learn meaningfully and with pleasure. The textbooks aim at making learning interesting, enjoyable and satisfying.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks.

NOT TO BE REPUBLISHED

Prof. G.S. Mudambadithaya
Coordinator
Curriculum Revision and
Textbook Preparation,
Karnataka Textbook Society (R),
Bengaluru, Karnataka

Nagendra Kumar
Managing Director
Karnataka Textbook Society (R),
Bengaluru, Karnataka

About the book.....

This text book is developed based on the guidelines of the National Curriculum Frame work(NCF-2005), set by the National Council of Educational Research and Training(NCERT) considering the progress in the research and development and the new challenges that humankind is likely to face in the years to come.

While attempting to adopt the NCF 2005 framework to the text books of 'Environmental Studies' for classes 3 and 4 for the State of Karnataka, we have taken into account the socio-econimic, environmental and cultural aspects of the State for easy connect and better understanding. We have tried integrating the science and social science concepts by softening the subject boundaries in the text books of Environmental Studies. The idea is that the children should view the natural and the social environments in a holistic manner from the beginning of the school education. We have included a wide range of topics from family to plants and animals to festival on the lines of the NCF 2005 guidelines.

As students move from 2nd to higher standards, their observation skills using their senses to gather and record information improve. During this stage, the students are able to observe, explore, experiment, read, write, possess the knowledge of numbers, appreciate, empathise and ask questions about their immediate environment. They start understanding the perspectives. Students discover wider range of things and phenomena, though still predominantly focused on their immediate environment and day-to-day experiences. They begin to make links and apply knowledge of environment to their daily life. Considering these developments, we have introduced some of the basic concepts of their immediate natural and social environment in the textbooks. We have designed these books with objective of familiarizing children with their surroundings / local knowledge so that they start appreciating the

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

environment they are living in and value every component that comes with it. We also have included simple activities involving observation, measurements, analysis, synthesis to engage them in the learning process and make the learning exciting and participative. The idea is also to stimulate children to enquiry - based learning. We have tried our best to make these books gender neutral in terms of language and presentation of the concepts. At the beginning of every lesson, we have given the competencies that the children should develop after each lesson, to help teachers facilitate the learning process. We have made the books as attractive as possible with illustrations. This has an added advantage of making communication simple and easy.

While the thought provoking para of Rabindranath Tagore from 'Civilization and Progress', which NCF 2005 opens with, is indeed inspiring for every teacher to search and adopt new and innovative teaching-learning approaches, encouraging children's creative spirit and enquiry-based learning, we welcome comments and suggestions from the teachers, parents and public for further refinement.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

Environment Education is that Education of the Environment, through the Environment and for the Environment, natural and social.

Dr. R. Shailaja,

Chairperson, Text Book Committee.

Text Book Committee

Chairperson:

Dr. R. Shailaja, Director, Regional Environmental Studies Center, South Zone, 143, Infantry Road, Bengaluru.

Members:

Smt. R.N. Vasantha Sujay, Asst. teacher, G.H.S, Hebbala, Bengaluru.

Sri Ashwathanarayana, C.R.P., Begli Hosahalli Cluster, Kolar.

Sri K.N. Madhusudana Rao, C.R.P., Hirehalli Cluster, Tumakuru.

Sri Raghavendra Sunagar, Asst. teacher, G.H.S, Marakamdinni, Manvi Tq., Raichur.

Smt. K.V. Geetha, Asst. teacher, G.H.P.S., Ayodhyanagar, Puttur Tq. Dakshina Kannada.

Sri V.B. Shinge, Drawing teacher, Karnataka High School, Dharwad.

Scrutinizer:

Prof. G.S. Mudambadithaya, Co-ordinator, Curriculum revision and Text book preparation, KTBS, Bengaluru.

Editorial Board:

Prof. M.R. Nagaraju, Educationist, Yelahanka upanagara, Bengaluru.

Prof. H.S. Lakshminarayana Bhatta, Professor of Physics(Retd.), Basaveshwaranagar, Bengaluru.

Dr. M.J. Sundar Ram, Professor of Zoology(Retd.), Girinagar, Bengaluru.

Translators :

Sri P.C. Halgekar, Asst. teacher, Rangubai Bhosale High School, Belagavi.

Sri R.G. Kulkarni, Asst. teacher, Govt. M.H.P.S., Gunji, Khanapur Tq. Belagavi.

Chief Co-ordinator:

Prof. G.S. Mudambadithaya, Co-ordinator, Curriculum revision and Text book preparation, KTBS, Bengaluru.

Chief Advisors:

Sri Nagendra Kumar, Managing Director, KTBS, Bengaluru.

Smt. C. Nagamani, Deputy Director, KTBS, Bengaluru.

Programme Co-ordinator:

Smt. N.R. Shailaja Kumari, Senior Assistant Director, KTBS, Bengaluru.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

About the Revision of Textbooks

Honourable Chief Minister Sri Siddaramaiah who is also the Finance Minister of Karnataka, in his response to the public opinion about the new textbooks from standard I to X, announced, in his 2014-15 budget speech of constituting an expert-committee, to look into the matter. He also spoke of the basic expectations there in, which the textbook experts should follow: "The textbooks should aim at inculcating social equality, moral values, development of personality, scientific temper, critical acumen, secularism and the sense of national commitment", he said.

Later, for the revision of the textbooks from class I to X, the Department of Education constituted twenty seven committees and passed an order on 24-11-2014. The committees so constituted were subject and class-wise and were in accordance with the standards prescribed. Teachers who are experts in matters of subjects and syllabi were in the committees.

There were already many complaints, and analyses about the textbooks. So, a freehand was given in the order dated 24-11-2014 to the responsible committees to examine and review text and even to prepare new text and revise if necessary. Eventually, a new order was passed on 19-9-2015 which also gave freedom even to re-write the textbooks if necessary. In the same order, it was said that the completely revised textbooks could be put to force from 2017-18 instead of 2016-17.

Many self inspired individuals and institutions, listing out the wrong information and mistakes there in the text, had send them to the Education Minister and to the Textbook Society. They were rectified. Before rectification we had exchanged ideas by arranging debates. Discussions had taken place with Primary and Secondary Education Teachers' Associations. Questionnaires were administered among teachers to pool up opinions. Separate meetings were held with teachers, subject inspectors and DIET Principals. Analytical opinions had been collected. To the subject experts of science, social science, mathematics and languages, textbooks were sent in advance and later meetings were held for discussions. Women associations and science related organistations were also invited for discussions. Thus, on the basis of all inputs received from various sources, the textbooks have been revised where ever necessary.

NOT TO BE REPUBLISHED

Another important aspect has to be shared here. We constituted three expert committees. They were constituted to make suggestions after making a comparative study of the texts of science, mathematics and social science subjects of central schools (NCERT), along with state textbooks. Thus, the state text books have been enriched based on the comparative analysis and suggestions made by the experts. The state textbooks have been guarded not to go lower in standards than the textbooks of central school. Besides, these textbooks have been examined along side with the textbooks of Andhra Pradesh, Kerala, Tamil Nadu and Maharashtra states.

Another clarification has to be given here. Whatever we have done in the committees is only revision, it is not the total preparation of the textbooks. Therefore, the structure of the already prepared textbooks have in no way been affected or distorted. They have only been revised in the background of gender equality, regional representation, national integrity, equality and social harmony. While doing so, the curriculum frames of both central and state have not been transgressed. Besides, the aspirations of the constitution are incorporated carefully. Further, the reviews of the committees were once given to higher expert committees for examination and their opinions have been inculcated into the textbooks.

Finally, we express our grateful thanks to those who strived in all those 27 committees with complete dedication and also to those who served in higher committees. At the same time, we thank all the supervising officers of the Textbook Society who sincerely worked hard in forming the committees and managed to see the task reach its logical completion. We thank all the members of the staff who co-operated in this venture. Our thanks are also to the subject experts and to the associations who gave valuable suggestions.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

Sri M. P. Madegowda
Managing Director
Karnataka Textbook Society (R)
Bengaluru.

Prof. Baraguru Ramachandrappa
Chairman-in-Chief
Textbook Revision Committees
Karnataka Textbook Society (R)
Bengaluru.

Revision Committee

Chairman-in-Chief :

Prof. Baraguru Ramachandrappa, State Textbook Revision Committees, Karnataka Textbook Society, Bengaluru.

Chairperson :

Dr.S.Shishupala, Professor and Chairman, Department of microbiology, Davanagere University, Davanagere

Members:

Smt.K. Mamatha, Asst. teacher, GHS, Kengeri Upanagara, Bengaluru.

Sri K.S. Gireesh, Asst. teacher, GHS, Jalige, Devanahalli Tq., Bengaluru Rural Dist.

Smt. G. Renuka, Asst. teacher, GHS, Honnashettihally, Gubbi Tq., Tumakuru Dist.

Smt. R.N. Vasantha Sujay, Asst. teacher, GHS, Hebbala, Bengaluru.

Smt. A. Lakshmidevi, Asst. teacher, GHPS, Kaveripura, Bengaluru.

Smt. B. Hemalatha, Asst. teacher, GLPS, K. Narayanapura, Bengaluru.

Artist :

Sri U. Hazarat Ali., Lecturer, Department of Fine Arts,Tumkur University, Tumakuru.

High Power Review Committee Members :

Dr. T.R. Anantharamu, Senior Scientist(Retd.), Geological Survey of India, Bengaluru.

Prof. V.S. Vatsala, Principal (Retd.), M.E.S College, Malleswaram, Bengaluru.

Dr. G.M. Nijaguna, Principal (Retd.), Vijaya College, Basavanagudi, Bengaluru.

Prof. K.S. Nataraj, Professor of Physics(Retd.), National College, Jayanagara, Bengaluru.

Translators :

Sri P.C. Halgekar, Asst. teacher, Rangubai Bhosle High School, Belagavi.

Sri R.G.Kulkarni, Asst. teacher (Retd.), Khanapur, Belagavi District.

Chief Advisors :

Sri M. P. Madegowda, Managing Director, Karnataka Textbook Society, Bengaluru.

Smt M. D. Usha, Deputy Director, Karnataka Textbook Society, Bengaluru.

Programme Co-ordinator :

Sri Ashwath Narayana K. N., Senior Assistant Director, KTBS, Bengaluru.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अनुक्रमणिका

C2U9X4

पाठ क्र.	पाठ	पृष्ठ संख्या
1.	बागेतील एक दिवस	1 - 11
2.	हिरवी संपत्ती	12 - 19
3.	घुबडाचा न्याय	20 - 27
4.	पाण्याच्या थेंबाची गोष्ट	28 - 43
5.	पाण्याचे विश्व	44 - 53
6.	आहाराची विविधता	54 - 66
7.	आपले स्वयंपाकघर	67 - 75
8.	चला आपण घर बांधुया	76 - 79
9.	सुंदर घर	80 - 86
10.	आपली ज्ञानेंद्रिये	87 - 96
11.	दातांचे महत्व	97 - 103
12.	धोका - अपघात	104 - 110

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 1

बागेतील एक दिवस

G4S2Y8

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- पाहिलेल्या प्राण्यांचे विविध रंग, आकार, रचना, यांचे वर्णन करशील.
- पक्ष्यांचे आवाज, आहाराच्या सवयी आणि निवासस्थाने यांचे वर्णन करशील.

सायंकाळी घरी जात असताना मुलामुलींचा समुह आपापसात बोलत जात आहे.

वंदना : व्वा! बगळ्यांची रांक पहा.

लतिका : आहा! ते आमच्या बागेकडे उडत जात आहेत. आता तळ्याच्या काठावर असलेल्या झाडावर बसत आहेत.

अरुणा : आम्ही तिथे जाऊन त्यांना पाहुया चला.
(सर्वजण बागेतील तळ्याजवळ जातात)

तेरेसा : आवाज न करता या. झाडावर फक्त बगळेच नाहीत तर खार, मुंग्या, कोळी, वटवाघुळ, मैना असे अनेक प्राणी, पक्षी व कीटक आहेत. ते पळून जातील.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



चित्रात दर्शविलेल्या प्राण्यांचे/पक्ष्यांचे/कीटकांचे नाव त्याच्या समोर दिलेल्या रिकाम्या जागी लिही.

लतिका :तळ्यात पहा. मासे आणि बेडूक दिसतात. कासव देखील पाण्यात पोहत आहे

अरुणा : पक्ष्यांचे आवाज ऐकायला गोड वाटतात, होय ना?

अली : आम्ही पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल करुया का?

कृती :

- तुझ्या परिसरातील तू पाहिलेल्या पक्ष्यांची नावे लिही.
- तू कोणकोणत्या पक्ष्यांचे आवाज ऐकले आहेस? ते लिही.
- पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल कर. तुझ्या मित्र/मैत्रिणिंना देखील आवाजाची नक्कल करण्यास सांग.

सिमा : थांबा, थांबा, हे आता पुरे, आमच्या नकलांनी पक्षी उडून जातील.

लतिका : बापरे! रंगाप्पाकाका, या बागेचा माळी इकडेच येत आहे. तो पक्ष्यांव प्रेम करतो. पक्षी जर उडून गेले तर त्याला राग येतो. तेव्हा आवाज करणे थांबवा.

रंगप्पा : लतिका, तू इथे कशी काय आलीस?

लतिका : काका, आम्ही येथे बगळे पहायला आलो आहोत.

रंगप्पा : तुला पक्ष्यांची माहिती आहे का?

आनंद : हो, आम्हाला अनेक गोष्टी माहीत आहेत.

रंगप्पा : ठीक आहे. मी तुम्हाला काही प्रश्न विचारतो, तुम्ही उत्तर द्याल?


सर्वजण : हो ..... आम्ही उत्तर देऊ.

रंगाप्पा : मी वर्णन करतो त्या पक्ष्याचे नाव मला सांगा.


- कोणता पक्षी हिरवा असतो?
- काळा पक्षी कोणता?
- लांब शेपूट असलेला पक्षी कोणता?
- लांब पाय असलेला पक्षी कोणता?

@SCERT NOT TO BE REPUBLISHED

- लांब मान असलेला पक्षी कोणता?
- लांब चोच असलेला पक्षी कोणता?
- बगळा काय खातो?
- गरुड काय खातो?
- तू पाहिलेला सर्वात लहान पक्षी कोणता?
- तू पाहिलेला सर्वात मोठा पक्षी कोणता?
- खालील चित्रात दाखविलेल्या पक्ष्याचे वैशिष्ट्य काय?



रंगप्पा : छान, तुम्हाला पक्ष्यांची थोडी फार माहिती आहे. आता मी तुम्हाला काही घरटी दाखवितो. ती तुम्ही कोणत्या पक्ष्याची आहेत ते ओळखा.



अली : तिथे पहा, सुगरण पक्ष्याचे घरटे. हा पक्षी माणसापेक्षाही चांगले घरटे बांधतो. इतके सुंदर घरटे बांधायल ह्या पक्ष्याला कोणी शिकवल?

कृती : घार आणि सुगरण पक्षी घरटे कसे बांधतात ते जाणून घे.

रंगाप्पा : होय, हे खर आहे अली. काही दिवसापूर्वी काय घडल हे तुला माहीत आहे काय? माझा मित्र कल्लेशी रस्त्याच्या बाजूला मेंढ्या चारत होता. तेव्हा तेथे एक कार येऊन थांबली. त्यातून एक माणूस उतरला व तो येथील झाडावर लोंबत असलेले सुगरणीचे घरटे काढावयास गेला. कल्लेशीने ते पाहिल आणि पळत जाऊन त्याला थांबविला. त्या माणसाला आश्चर्य वाटले. त्याने विचारले ''मला का थांबवितोस?'' कल्लेशी त्याला म्हणाला ''तुम्ही घरट काढून नेता परंतू सुगरण ज्यावेळी परत येईल तेव्हा घरटे न दिसल्याने ती तळमळायला लागेल आणि ते मला सहन होणार नाही''.



पक्ष्यांबद्दल कल्लेशीचे प्रेम पाहून त्या माणसाला आश्चर्य वाटले. आपल्याला एक चांगली गोष्ट शिकविल्याबद्दल त्याची स्तुती केली व घरट्याला हात न लावता तो परतून गेला.

लतिका : काका, आम्हालासुद्धा पक्ष्यांना, त्यांच्या घरट्यांना वाचवायचे आहे. तेव्हा आम्ही काय कराव?

रंगाप्पा : तुमच्या घराजवळ अथवा शाळेजवळ पक्ष्यांसाठी घरटी बांधून झाडांवर टांगा. त्यांच्यासाठी घरट्याजवळ बाजूला पिण्यासाठी एका वाटीत पाणी व दुसऱ्या वाटीत खाण्यासाठी थोडे दाणे घालून ठेवा. झाडे लावा. त्यांचे रक्षण करा. त्यामुळे पक्ष्यांची संख्या देखील वाढेल.

हे तू स्वतः कर :

पक्ष्यासाठी घरटे तयार कर.

एक जुने मडके घे. त्यावर एक कापड बांध. त्या कापडाला मध्ये मडक्यात पक्षी आत येऊ जाऊ शकेल इतक्या आकाराने काप. मडक्याला खाली काही लहान लहान भोके कर. त्यामुळे मडक्यात पाणी साठणार नाही. घरातील मोठ्या माणसांची मदत घेऊन ते मडके झाडावर टांग. पक्ष्यांना दररोज पाणी आणि धान्य ठेवत रहा.



© BITES NOT TO BE REPUBLISHED


वंदना : पक्ष्यांमुळे आमच्या शेतांचे नुकसान होत नाही का?

रंगप्पा : नाही बाळ. त्यांच्यापासून आमचे चांगले होते. पक्षी पिकांवर असणारे कीटक खातात. त्यामुळे पिकांचे होणारे नुकसान कमी होते व पीक चांगले येते.

कृती : पक्ष्यांची पडलेली पिसे जमा कर. तुमच्या शिक्षकांची अथवा वडीलधाऱ्यांची मदत घेऊन ती पिसे कोणत्या पक्ष्यांची आहेत हे जाणून घे. जुन्या वहीमध्ये ती चिकटवून त्यांचा अल्बम् तयार कर.

सीमा : बापरे! केवढा मोठा कोळी. इथे तो झाडावर आहे. ते घरात देखील असतांत ना?

अरुणा : होय. घरामध्ये झुरळ, पाली, माश्या, उंदीर, डास आणि त्यांच्यासोबत कोळी असतो. यांच्या शिवाय आम्ही पाळलेले गाय, म्हैस, मेंढी, कबूतर, मांजर व कुत्रा हे देखील असतात.


झुरळ


पाल



माशी


उंदीर


मांजर


डास


कोळी


गाय


म्हैस


मेंढी


कबुतर


तेरेसा : आई गं! कोणी उडी मारली ?

लतिका : भिऊ नको. तो बेडूक आहे. तळ्यातील पाण्यातून त्याने जमिनीवर उडी मारली.

तेरेसा : तो बेडूक जमिनीवर काय करत आहे ?

आनंद : तुला माहीत नाही; बेडूक, कासव, मगर हे जमिनीवर आणि पाण्यात दोन्हीकडे राहतात.


बेडूक


कासव



मगर


वनिता : मग फक्त पाण्यातच राहणारे प्राणी कोणते ?

आनंद : मासे, कोळंबी.

@KEBS NOT TO BE REPUBLISHED

वनिता : माझ्या आजीच घर समुद्राच्या जवळ आहे. ती सांगत होती की तिथे कोळंबी, खेकड़ा, कासव, तारामासा, शंख आणि शिंपल्यातले प्राणी आढळतात. तेथील वाळूमध्ये अनेकवेळा खेकडे, तारामासे यांना पाहिले आहे. पुढील खेपेला मी येताना तिथून काही शिंपले आणिन.



झिंगा


खेकडा


कासव


तारामासा


गोगलगाय


शंख


घोण (सहस्त्रपाद)


जेली फीश


शिंपले

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

रंगाप्पा : त्या शंख, शिंपल्यात प्राणी असतात. म्हणून शंख शिंपले तू आणू नको, त्यांना तू पाण्यात सोड, नाही तर ते मरतील.

वनिता : ठीक आहे. मी तसेच करीन.

रंगाप्पा : तुम्ही अनेक प्राणी पाहिलेत. त्यांचा आकार, रंग, रचना सारखीच असते का?

लतिका : नाही. प्रत्येकाचा रंग, आकार, रचना वेगवेगळी असते.

रंगाप्पा : खरे आहे. प्राण्यांचे इतके प्रकार आहेत की त्यांना मोजणे कठीण आहे.

कृती : खाली काही प्राण्यांची नावे दिली आहेत. त्यांच्या आकारमानानुसार लहानापासून मोठ्यापर्यंत क्रमात लिही.

गाय, कुत्रा, शेळी, कबुतर, मधमाशी, मुंगी, चिमणी, हत्ती, टोळ, मांजर.

_____,_____,_____, _____, _____,

_____,_____,_____, _____, _____.

वनिता : या झाडावर, या तळ्यात कितीतरी प्रकारचे पक्षी, कीटक आहेत.

रंगाप्पा : कीटक आणि पक्षी हे प्राणीवर्गातच येतात.

अली : काही प्राणी गवत खातात. काही धान्य खातात तर काही कीटक, मांस खातात.

रंगाप्पा : होय, जे प्राणी गवत, धान्य, फळे, भाजीपाला इत्यादी खातात ते शाकाहारी प्राणी. जे प्राणी कीटक, मांस आणि इतर प्राण्यांना खातात ते मांसाहारी प्राणी.

@MKRS NOT TO BE REPUBLISHED




सिमा : मी फळे, मासे दोन्हीही खाते.

रंगप्पा : तू मिश्राहारी आहेस. कुत्रा, मांजर या सारखे प्राणी देखील मिश्राहारी आहेत. जे वनस्पती व प्राण्यांपासून मिळालेला आहार सेवन करतात ते मिश्राहारी होत.



NOT TO BE REPUBLISHED

हा खेळ खेळा : जमिनीवर एक मोठे वर्तूळ काढा. त्या वर्तुळाचे तीन समान भाग करा आणि त्या भागांना प्रत्येकी शाकाहारी, मिश्राहारी आणि मांसाहारी अशी नावे द्या. त्या वर्तुळाच्या मध्यावर एका डब्यात विविध प्राण्यांची चित्रे ठेवा. वर्गातील प्रत्येक मुलाने एक चित्र उचलून घ्यायचे आणि तो प्राणी ज्या प्रकारचा आहार सेवन करतो त्या भागात मुलाने जाऊन उभे रहावे. जो मुलगा चुकीच्या भागात उभा राहतो तो आऊट. हा खेळ तुम्ही असा देखील खेळू शकता. तुम्ही तुमच्या मित्रां सोबत वर्तुळाच्या बाहेर थांबा. तुमच्यापैकी एकाने वर्तुळमध्यावर उभे राहून एक प्राण्याचे नाव घ्यावे. तो प्राणी कोणता आहार घेतो हे ओळखून त्या प्रकारच्या भागात जाऊन थांबावे. जो चुकतो तो आऊट्.



तेरेसा : अरे बापरे! अंधार होत आहे. आपण घरी जाऊया का?

रंगाप्पा : ठीक आहे, तुम्ही सारे घरी चला. उद्या रविवार आहे. सकाळी लवकर उठा आणि बागेत एकत्र या. आम्ही पक्ष्यांना पाहूया.

हे प्राणी कोठे रहातात रेष मारुन जोड्या जुळव :

अ	ब
सिंह	वारुळ
साप	गुहा
मासा	झाड
माकड	तळे
मधमाशी	बीळ
तारामासा	नदी
बगळा	घरटे
उंदीर	समुद्र
झुरळ	पोळ
सुगरण	चीर

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृती : या चित्रात दर्शविलेल्या प्राण्यांची नावे त्याच्या बाजूला दिलेल्या रिकाम्या जागेत लिही.



© BALBHARATI NOT TO BE REPUBLISHED

पाठ 2

हिरवी संपत्ती

K5I3F1

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- वनस्पतींचे आकार, रंग, त्या वाढण्याचा प्रदेश आणि आकारातील विविधता जाणून घेऊन आणि वनस्पतींची जोपासना करण्याची भावना तुझ्यात वाढीस लागेल.
- आपल्या प्रदेशात आढळणाऱ्या वनस्पतींची विविधता जाणून घेशील.
- पिकांबद्दल माहिती जाणून घेशील.
- वेगवेगळ्या प्रकारच्या पानांचा संग्रह करुन त्यांचा आकार, रंग, रचना, वास या बद्दल चर्चा करशील.
- काही ऋतूमध्ये झाडांची पाने गळण्याचे निरीक्षण करशील.
- गळालेल्या पानांचा वापर करुन खत तयार करणे समजून घेशील.
- विविध वस्तूवर काढलेल्या पानांच्या चित्रावरुन पाने ओळखशील.

©KSBS NOT TO BE REPUBLISHED

मागील इयतेत तू वनस्पतीबद्दल थोडे शिकला आहेस. तुझ्या सभोवताली आढळणाऱ्या वनस्पतींचे निरीक्षण तू केला असशील. त्यातील तुला माहीत असलेल्या 10 वनस्पतींची नावे लिही.

_____, _____, _____, _____,


_____, _____, _____, _____,

_____, _____ .

गुलाब आणि जास्वंदीच्या रोपांचे निरीक्षण कर. त्या रोपांच्या फांद्या रोपाच्या खालील बाजूने वाढत जातात, नाही का? त्यामुळे ह्या वनस्पतींना 'झुडूप' अथवा 'पुंजके' म्हणतात.

तू 10 वनस्पतींची नावे लिहिला आहेस. आता त्यातील रोप, झुडूप, वृक्ष आणि वेली कोणत्या ते सांग.


तू त्या वनस्पतींचे रोप, झुडूप, वृक्ष आणि वेल असे गट का केलास त्याचे विवरण कर.



रोप ही लहान वनस्पती असते आणि त्याचे खोड खूप मृदू असते.



झुडूपाचे खोड हे थोडे कठीण असते. त्याच्या फांद्या वनस्पतीच्या खालच्या भागाकडून पसरतात.



वृक्षाचे खोड हे कठीण असते आणि त्याची उंच वाढ होते.




वेलीचे खोड लांब असते परंतू त्याच्या आकार बारीक असतो.

© @KTBS NOT TO BE REPUBLISHED

वनस्पतींची उंची आणि खोडाची कठीणता यावरुन वनस्पतीचे रोप, झुडूप, वृक्ष आणि वेली असे गट करण्यात आले आहेत.

वनस्पतीपासून आपल्याला आहार, चारा, खत, इंधन, फळे आणि औषधे मिळतात हे तुला माहीत आहे. हे सारे आपल्याला वनस्पतीच्या विविध भागापासून मिळते.

या चित्रात वनस्पतीच्या भागांची नावे दिलेल्या जागेत लिही.



तू पाहिलेल्या वनस्पतीच्या विविध भागांच्या रंगाची नावे लिही.

पान _____ मूळ _____

खोड _____ कच्चे फळ _____

फुल _____ पिकलेले फळ _____

© NCERT NOT TO BE REPUBLISHED

जाणून घे.

- सामान्यतः पाने हिरवी असतात.
- खोड हिरवे, तपकिरी किंवा करड्या रंगाचे असते.
- फुलांचे रंग अनेक असतात जसे - लाल, पिवळा, पांढरा, केसरी इत्यादी
- कच्चे फळ सामन्यतः हिरवे असते.
- पिकलेली फळे विविध रंगाची असतात - तांबडी, पिवळी, हिरवी इत्यादी.

तुझ्या घरामध्ये वापरत असलेल्या वनस्पतींचे विवरण खालील तक्त्यात भर.

	वनस्पतीचे नाव	रोप/झुडूप वेल/वृक्ष	वापरला जाणारा भाग	उपयोग
नमूना	पडवळाचा वेल	वेल	कच्चे फळ	भाजी

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृती :

- तू तयार केलेला वनस्पतींच्या विवरणाचा तक्ता व तुझ्या मित्र/मैत्रिणींनी तयार केलेला तक्ता एकत्र करुन मोठा तक्ता तयार करुन शाळेत लाव.
- तुझ्या घरासभोवती आणि शाळे सभोवती आढळणाऱ्या विविध वनस्पतींची संख्या तुझ्या मित्र मैत्रिणींच्या सहाय्याने मोज.
- स्वयंपाकासाठी कोथिंबीर, पुदीना, कढीलिंब यांचा वापर का करतात हे जाणून घे. ज्या वनस्पतींच्या पानांना चांगला वास येतो अशा पाच वनस्पतींची नावे लिही.


_____ , _____ ,

_____ , _____ ,

_____.

- वेगवेगळ्या वनस्पतींच्या पानांचा संग्रह कर. त्यांच्या आकारांचे निरीक्षण कर. ती पाने वाळवून तुझ्या वापरलेल्या वहीमध्ये चिकटव.

गा आणि आनंद लुटा.



मी आहे हिरवा
आहे वनस्पतीचा प्राण,
गंध वेगळा आकार वेगळा
परिसर शोभून दिसतो छान.



झाडावर वाढतो
जामिनीवर पडतो,
खत होऊन पुन्हा
वनस्पतींना मिळतो.

झाडावर असताना
केली त्याची सेवा,
खाली पडून खत होऊन
मिळतो मी त्याला.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कृती : शाळेच्या आवारात पडलेली झाडांची पाने मित्रांच्या मदतीने एकत्र कर. शिक्षकांच्या मदतीने पानांचे खत तयार कर. त्या खताचा वापर कसा करावा याची चर्चा करुन त्याचा वापर कर.

वेगवेगळ्या पानांची चित्रे काढ.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हे तू स्वतः कर:

- चिखलाची वडी कर त्यावर पान ठेवून पानावर दाब दे आणि चित्र तयार कर.
- कागद घेऊन ते कापून विविध आकाराची पाने तयार कर व त्याना रंगव.

विविध वस्तूवर काढलेल्या पानांच्या चित्रांचे निरीक्षण कर.




हे तू स्वतः कर: कागदाच्या पानांचा वापर करुन तोरण तयार कर. शाळा/घर सुशोभीत कर.

पाण्यात वाढणाऱ्या वनस्पती तू पाहिल्या असशील. त्यांची नावे तू सांगशील का?

कमळ, लिली इत्यादी वनस्पती पाण्यात वाढतात. कमळफुलाच्या पानांना पहा ती तरंगत असल्यासारखी वाटतात.





मोठ्या वृक्षाच्या फांदीवर वाढलेल्या वनस्पतीबद्दल तुला माहीत आहे का? तुझ्या परिसरात आढळणाऱ्या अशा वनस्पतीचे निरीक्षण कर. त्यांना **बांडगूळ** म्हणतात.

@KTBS TO BE REPUBLISHED



तू कधी शेतात गेला आहेस का? शेतकरी शेतामध्ये कोण कोणती पिके पिकवितो? खाली दिलेल्या रिकाम्या जागेत पिकांची नावे लिही. यासाठी शिक्षकांची मदत घे.

_____, _____, _____, _____, _____,

_____, _____, _____, _____, _____.


जाणून घे.

आम्हाला तांदूळ, नाचणा, जोंधळा, कडधान्य, तेलबिया इत्यादी वनस्पती-पासून मिळतात. या वनस्पतींची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यासाठी **विशाल** जागेची आवश्यकता असते. ती जागा म्हणजेच शेत. शेतात वाढविलेली वनस्पती म्हणजेच धान्य.

आपल्या सभोवती अनेक प्रकारच्या वनस्पतींची वाढ होते. ह्या वनस्पतीपासून किती प्रकारच्या वस्तू मिळतात हे तुला माहीत आहे का?

हे तू स्वतः कर:

- तुझ्या घरातील इतरांचे सहाय्य घेऊन घरासमोर छोटी बाग तयार कर. त्यात फुले, भाजीपाला, फळांची रोपे लाव. त्यांना पाणी आणि खत घालून त्यांची जोपासना कर.
- तुझ्या शिक्षकांची, वर्गमित्रांची मदत घेऊन शाळेच्या आवारात विविध वनस्पतींची लागवड करुन त्यांची जोपासना कर.
- विनाकारण रोप आणि पान तोडू नकोस.



© SCERT, MBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ 3

घुबडाचा न्याय

F9Z8X8

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- सजीव आणि निर्जीव यांच्यातील फरक ओळखशील.
- प्राणी व वनस्पतीतील साम्य आणि भेद् ओळखशील.



एकदा आंब्याचे झाड आणि माती यांच्यात दोघापैकी कोण श्रेष्ठ याबाबत गरमागरम वाद चालू होता.

आवाज ऐकून मांजर, माकड, साप आणि घुबड तिथे जमा झाले. प्रत्येकाने घुबडाला त्या दोघांचे ऐकून योग्य न्याय देण्यासाठी सांगितले. ठीक आहे म्हणत आपला घसा साफ करत त्यांने त्या दोघांना आपली बाजू मांडण्यास सांगितले.



NOT TO BE REPUBLISHED

माती : मी नाही तर हा आंबा कसा असेल? माझ्याशिवाय याचा जन्म होणारच नाही त्याला पाहिजे असलेले पाणी, आहार मीच देते, म्हणून मी श्रेष्ठ.

आंबा : मी प्रत्येकाला गोड फळ देतो. पक्ष्यांना राहण्यासाठी घरट्याला लागणारी जागा देतो. एवढच नाही तर मी देखील सजीव आहे.

घुबड : अरे आंब्या! तू सजीव आहेस हे कशावरून सांगतोस?

आंबा : हे पाहा, प्रथमतः माझ्यापासून माझ्यासारखीच रोपे जन्माला येतात. दुसरी गोष्ट माझ्या बियांना कोंब येऊन त्याचे रोप होते, ते वाढून माझ्यासारखे मोठे झाड तयार होते.

घुबड : बरोबर, तुझ्यासारख माती काही करु शकत नाही; परंतू तुला वाढण्यासाठी पाणी, आहार यांची गरज आहे. ते तुला कसे मिळते?

आंबा : मातीपासून.

घुबड : पाहिलास, तुला वाढण्यासाठी माती पाहिजे.

आंबा : परंतू मला आहार माझ्याच गळलेल्या पानापासून मिळतो.

माती : पण ते माझ्याद्वारे मिळते ना.

घुबड : हे पाहा, आम्हाला तुम्हा दोघांचीही गरज आहे. इथे कोणी श्रेष्ठ नाही की कोणी लहान नाही.

खार : मित्र घुबडा, आंबा सांगतो तो सजीव आहे. मग मातीचे काय?

घुबड : माती वाढत नाही, तिला आहाराची गरज नाही. ती निर्जीव आहे.

माकड : असे असताना तू दोघेही समान व दोघांचीही आम्हाला गरज आहे असे का म्हणालास?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

घुबड : अरे मित्रा, तू सभोवताली बघ. माती, पाणी आणि हवा आहे. हे सर्व निर्जीव आहेत पण तू जरा विचार कर आम्ही हवा, पाणी आणि माती नसताना राहू शकू का?

सर्वजण : नाही, कधीही नाही.

सर्वांनी घुबडाचा जयजयकार केला आणि आनंदाने निघून गेले.




तुझ्या सभोवतालच्या अनेक वस्तू तू पाहिला आहेस. त्यांचे सजीव आणि निर्जीव असे वर्गीकरण करुन खालील तक्त्यात लिही.

जीव असलेले (सजीव)	**जीव नसलेले (निर्जीव)**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

तू सजीव आणि निर्जीव हे कसे ओळखशील? घुबडाने सांगितलेले मुद्दे लक्षात घे.

खालील चित्रांची तुलना कर :

आधी	नंतर
	
	
	
	
	

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


यात सजीव कोणते? सजीवांना तू कसे ओळखलास?

सजीवांची वाढ होते.



वरील चित्रे पहा. त्यातून तुला काय समजले ते सांग. टेबल, खुर्ची आहार सेवन करतात का?

सर्व सजीवांना आहार पाहिजे.



या चित्रातून तुला काय समजले ?


© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कधी एक पुस्तक दुसऱ्या पुस्तकाला जन्म देते का? कधी एका बाहुलीपासून दुसरी बाहुली जन्मली आहे का? विचार कर.

सजीव आपल्या सारख्याच सजीवांना जन्म देतात.

खालील चित्रे पहा.






या चित्रातून तुला काय समजले?

सजीव श्वासोच्छ्वास करतात.

हे तू स्वतः कर:



नाचणे, वांगी, टोमॅटो, मिरची यापैकी कोणत्याही एक प्रकारच्या बियांचा संग्रह कर. एखादे रिकामे भांडे अथवा डबा घे. त्यात माती भर आणि त्यात बिया पेर. त्यावर दररोज पाणी शिंपड. एक आठवडयामध्ये त्या बियामध्ये झालेला बदल बघ. तुला आढळलेला बदल येथे लिही.


_____


_____

प्राणी आणि वनस्पती हे सजीव आहेत. हवा, पाणी, माती इत्यादी निर्जीव आहेत. सजीवांना जगण्यासाठी हवा, पाणी, माती यांची गरज आहे. सजीव आणि निर्जीव एकत्र रहाण्याच्या व्यवस्थेलाच परिसर म्हणतात.


@KRBS NOT TO BE REPUBLISHED


वनस्पती आणि प्राण्यामध्ये काही साम्य आहे. **उदाहरणार्थ,** वनस्पती आणि प्राणि श्वसन करतात. खालील चित्रांचे निरीक्षण कर. चित्राखाली दिलेल्या जागेत साम्य लिही.


















@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्राणी व वनस्पती यांच्यातील फरक तू पाहिला आहेस का? खालील चित्रे पहा. त्यात आढळणारे फरक चित्राखालील जागेत लिही:









@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

पाठ 4

पाण्याच्या थेंबाची गोष्ट


B6H5L8

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- पाण्याची विविध स्त्रोत जाणशील.
- घरात वापरण्यासाठी लागणारे पाणी किती अंतरावरुन कशापासून आणतात, ह्याचे विवरण करशील.
- रोजच्या वापरासाठी पाण्याची आवश्यकता व वापरण्याचे प्रमाण जाणून घेशील
- पाणी साठविण्याची सामुग्री, त्यांचे आकार आणि ती बनविण्यासाठी वापरलेली साधने या बाबत चर्चा करशील.
- पाण्याची साठवणूक आणि वापरण्यासाठी घ्यावयाच्या सुरक्षित पद्धती समजून घेशील.


© KTBS NOT TO BE REPUBLISHED

अरे बाळ ..... मी आहे पाण्याचा थेंब. मी ढगातून थेंब थेंब पावसाच्या रूपाने जमिनीवर येतो. मी आता तुमच्यावर पडणार, तुम्ही भिजणार. तेव्हा तू तुझ्या मित्रांबरोबर आत जा.






अरे थेंबा, मला भिजायला खूप आवडत. तू कोठे चाललास? मी आणि माझे मित्र तुझ्या बरोबर येतो. आम्हाला नेशील का .....?



मी तर वेगवेगळ्या ठिकाणी वहात जातो आणि तुम्हाला तिथे येणे फार कठीण होईल.



नाही..... आम्ही येणारच.



ठीक आहे ..... जमिनीवर पडल्यानंतर मी कोठे जातो हे तुम्हाला समजेल. तुम्ही येणार?




ओ हो! ... आम्ही तयार आहोत.



मुलांनो ..... पुढील चित्रे पहा आणि त्याखाली दिलेल्या जागेत त्यांची नावे लिहा.

© TBS NOT TO BE REPUBLISHED










@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ठीक आहे, मुलांनो मी ज्यात जाऊन मिळतो त्याला पाण्याचे ठिकाण किंवा स्रोत म्हणतात.





अरे पाण्याच्या थेंबा, तुला माहीत आहे का? आमच्या गावात देखील पाण्याची अनेक ठिकाणे आहेत.

होय का ?



कृती :

मुलांनो... खालील तक्त्यात पाण्याची स्त्रोत लपली आहेत. त्यांचा शोध करा.

नदी




तळे



पाऊस




ओढा




टा	पा	न	दी	ग	प	र	दी
पा	ऊ	ण	वा	पा	ओ	ढा	र
त	स	मु	द्र	गी	मि	ती	स
ण	रो	ण	व	वि	ही	र	प
ट	व	व	त	की	र	मि	झ
का	र	ना	ला	ट	प	ट	रा
च	क	ला	व	पा	त	ळे	की
त	हा	त	पं	प	पि	प	ह

झरा




विहीर






समुद्र




कुपनलिका

© MKTBS NOT TO BE REPUBLISHED



मुलांनो ..... तुम्हाला तुमच्या गावात कोण कोणत्या स्त्रोतातून किंवा कशावाटे पाणी मिळते ते खाली दिलेल्या जागेत लिहा.



नळावाटे लिहिलास ना? ते ही बरोबर.




नळाचे पाणी हे पाण्याचे स्त्रोत नाही? आम्ही त्यावाटे आलेले पाणी साठवून ठेवतो माहीत आहे का?




म्हणजे नळ हे माझे स्त्रोत नाही हे तुम्हाला माहीत आहे. विविध स्त्रोतातून मी निघून नळावाटे येतो. समजल? उदाहरणात मी तलावातून येईन किंवा नदीतून येईन.


©KTBS NOT TO BE REPUBLISHED




मुलांनो माझा वापर तुम्ही कोणत्या कारणासाठी करता हे खाली दिलेल्या थेंबाच्या चित्रात लिहा.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED




ठीक आहे, आता मला तुमच्या घरात कोठून आणता ते लिहा पाहू.





हे सारे तुमच्या घरापासून किती दूर आहेत ?













@KTBS NOT TO BE REPUBLISHED

मला तुमच्या घरी कोण आणत ? खाली दिलेल्या थेंबात तुझे उत्तर लिही.








कृती:


खाली दिलेला तक्ता काळजीपूर्वक वाच. त्यानंतर वेगवेगळ्या कामासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे स्त्रोत योग्यरित्या ओळखून त्या चौकात (✓) अशी खूण कर.

पाण्याचा वापर	नदी 	तळे 	विहीर 	कुपनलिका 	ओढा 	समुद्र 	झरा 
पिण्यासाठी			✓				✓
भांडी धुण्यासाठी							
कपडे धुण्यासाठी							
आंघोळीसाठी							
स्वयंपाकासाठी							
बागेसाठी							
पाळीव प्राणी धुण्यासाठी							
वाहने धुण्यासाठी							

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



बाळांनो तुमच्या शाळेमध्ये पिण्याचे पाणी मिळण्याची स्त्रोत कोणती?



तुमच्या घरात माझा संग्रह कशात करता?
खालील चित्रे पहा. त्याच्या बाजूला (✓) अशी खूण
करा आणि चित्राच्या खाली दिलेल्या
जागेत ते कशापासून बनविले आहे त्या पदार्थाचे नाव
लिही.





✓

माती















@KTBS
NOT TO BE REPUBLISHED



याच्या शिवाय तुम्ही दुसऱ्या एखाद्या पात्रात/भांडयात साठवत असाल तर त्यांची चित्रे काढा आणि त्यांची नावे लिहा.






@KTBS NOT TO BE REPUBLISHED

हुं ..... मुलांनो ह्या वस्तू/पात्र कशापासून बनविलेली आहेत? ते लिहा.









पाणी संग्रह करायच्या वस्तू माती, प्लास्टीक, स्टील, तांबे इत्यादीपासून बनविलेल्या असतात.

कृती :


तुझ्या घरी पाणी साठविण्याची खालील प्रकारची पात्रे किती आहेत ? मोज आणि इथे लिही.

पात्र				
स्टील	4	2	-	-
प्लास्टीक				
माती				
पितळ				
तांबे				
इतर				

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाणी साठवण्यासाठी तुझ्या घरातील सर्वात लहान व सर्वात मोठे जे पात्र वापरतात त्याचे चित्र काढ.






सर्वात लहान पात्र	**सर्वात मोठे पात्र**








ओह! माझा संग्रह तुम्ही अशा प्रकारे करता. मग, तुम्ही पिण्याच्या पाण्याचा संग्रह कसा करता?




आमच्या घरी पिण्याचे पाणी एखाद्या पात्रात ठेवून त्यावर झाकण ठेवतात.







©KTBS NOT TO BE REPUBLISHED



होय बाळानों .... पिण्याचे पाणी स्वच्छ असावे. ज्यात पाणी साठवितो ते भांडे सुध्दा स्वच्छ असावे इथे ऐका.....



पाणी उकळवून थंड करावे आणि स्वच्छ भांड्यात ठेवून त्यावर झाकण ठेवावे. असे पाणी प्याल्याने आरोग्य चांगले राहते.



ज्या भांड्याला नळ आहे अशात पाणी साठविणे चांगले. त्यातील पाणी घेतल्याने आमच्या हाताची घाण वगैरे त्यात जात नाही.




मोठ्या भांड्यातून पाणी घेत असतांना धरायला दांडी असलेले लहान भांडे वापरावे.


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

जाणून घे.

नेहमी शुद्ध पाणी प्यावे. पाण्याच्या भांडयावर नेहमी झाकण ठेवावे. पाण्याच्या भांडयातून पाणी घेताना आपले हात चांगले स्वच्छ धुवावेत.


खालील चित्र पहा





कृती :


मुलांनो .... तुम्हाला दररोज किती पाणी लागते ते मोजून इथे लिहा.



ठीक आहे आम्ही मोजतो.


कृती	ग्लासची संख्या	तांबे / मगची संख्या	घागरींची संख्या	बादल्यांची संख्या
सकाळी हात, पाय, तोंड धुण्यासाठी		5		
पिण्यासाठी	8			
आंघोळीसाठी				
कपडे धुण्यासाठी				
भांडी धुण्यासाठी				
फरशी पुसण्यासाठी				
शौचालयासाठी				
इतर				

@KYBS NOT TO BE REPUBLISHED



तुम्ही घरामध्ये किती पाणी वापरता हे समजले ना?


तुमच्या घरात एकूण किती माणसे आहेत?



तर मग तुझ्या घरात सर्वांसाठी किती पाणी लागते? ते लिही.

घरातील सदस्य	ग्लास	तांबे किंवा मग	घागरी	बादल्या
मी				
माझी आई				
माझे बाबा				
माझा भाऊ/माझी बहीण				
आजी/आजोबा/इतर				
एकूण				

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



पाहिलास तुला आणि तुझ्या घरातील सर्व सदस्यांना मिळून किती पाणी लागते ?




बाळांनो, तुम्हाला समजले का माझी किती आवश्यकता आहे? लक्षात घ्या, माझी गरज फक्त तुम्हालाच आहे असे नाही तर पृथ्वीवरील सर्व सजीवांना आहे. तेव्हा मला वाया घालवू नका, तुम्हाला जेवढी गरज आहे तेवढाच माझा वापर करा.

बरोबर आहे. थेंबा, तू जे सांगितलस ते आम्ही लक्षात ठेवू.



मुलांनो ..... आता पुरे तुम्ही आता घरी चला. इथे काय सांगितल ते घरातीत इतरांना सांगा. ठीक आहे, पुन्हा उद्या भेटूया, समजल!



ठीक आहे थेंबा, उद्या पुन्हा भेटूया!

गा आणि आनंद लुटा

आकाशातील ढगातून पडणाऱ्या पावसाच्या थेंबा,
मिळतोस तू कसा ओढा, नदी, सागराला.
ही सारी आहेत तुझी मूळ स्थाने सांग जरा मला,
मिळतोस तू कसा तळी, तलाव आणि सरोवराला.

तहान लागली तर तुझी गरज आम्हाला,
पीक, पाणी वाचवण्यासाठी हवास आम्हाला.
स्वंयपाकासाठी, स्नानासाठी हवास आम्हाला,
तहानलेली गाईगुरे पाहतात आम्हाला.

तुझ्या विना आम्ही जगू नाही शकत,
तुला वाचविण्या आम्ही राहु सदा जागत.
तुला नाही घालवायच वाया, नाही करायच दूषित,
तुला वाचविण्यातच आहे साऱ्या जगाचे हित.

NOT TO BE REPUBLISHED © MSCERT

पाठ 5

पाण्याचे विश्व

S6L3M4

या पाठाच्या अध्ययनानंतर तू,

- नदी आणि समुद्रात रहाणारे प्राणी ओळखशील.
- पाऊस झाल्यानंतर वनस्पती आणि प्राणी यांच्या प्रतिक्रियांचे निरीक्षण करशील.
